**प्रेसनोट**

जा.क्र. पोउआ/वाहतूक/५५५१/२०१८, पुणे शहर, दिनांक ०७.०५.२०१८

**विषय -२९ वा रस्ता सुरक्षा अभियानाच्या समारोप कार्यक्रम बाबत.**

--------------o-------------

पुणे शहर वाहतूक शाखेकडून दिनांक २३.०४.२०१८ ते दिनांक ०७.०५.२०१८ या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान साजरा करण्यात आला होता. या अभियानाच्या १५ दिवसांच्या कालावधीमध्ये मा.पोलीस आयुक्त, श्रीमती रश्मी शुक्ला,सह पोलीस आयुक्त श्री. रविंद्र कदम यांचे मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेकडील २८ वाहतूक विभागांमार्फतीने वाहतूक जनजागृतीविषयी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते.

२९ वा रस्ता सुरक्षा अभियानाचा समारोप कार्यक्रम आज दिनांक ०७.०५.२०१८ रोजी साय.१६.३० वा. पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे शहर याठिकाणी सन्माननीय प्रमुख पाहुणे मा. खासदार श्री. अनिल शिरोळे,मा.खासदार श्री. अमर साबळे यांचे तसेच पोलीस आयुक्त,पुणे शहर, मा.श्रीमती रश्मि शुक्ला, सह पोलीस आयुक्त, श्री. रविंद्र कदम, अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री.प्रदिप देशपांडे, पुणे महापालिका आयुक्त, श्री. सौरभ राव,प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे श्री, आजरी, पोलीस उप-आयुक्त,वाहतुक श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, श्रीमती ज्योती प्रिया सिंह, श्री पंकज डहाणे, श्री. तेली, श्री. हिरेमठ,श्री.सुर्यवंशी तसेच वाहतूक विभागाचे सहा.पोलीस आयुक्त श्री.पाटील व श्री.ढमाले,वाहतुक विभाग प्रभारी अधिकारी यांच्या उपस्थितीत झाला.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच रस्ता सुरक्षा पंधरवडा मध्ये वाहतुक जनजागृतीकरीता ज्या नागरीकांनी/कंपन्यांनी मदत केली अशा १५ नागरीकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच वाहतुक जनजागृतीचे संदर्भात तयार केलेली दिनदर्शिका व वाहतुक प्रबोधनावर तयार करण्यात आलेल्या १) इन डिसीप्लीन टू डिसीप्लीन २) कै.मंगेश तेंडुलकर यांचे वाहतुक जनजागृती योगदानपर अशा दोन सीडींचे मान्यवरांचे हस्ते अनावरण करण्यात आले. सुरक्षा पंधरवडा दरम्यान घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थीनीचा सत्कार करण्यात आला आहे. तसेच कार्यक्रमात वाहतुक कर्मचारी यांना कुलिंग जॅकेट व कुलिंग कॅप यांचे वाटप करण्यात आले.सदरचे जॅकेट व कॅप हे बाहेरील उष्ण वातावरणा पेक्षा ६ डिग्री सेल्सीयस वातारण कमी राहते त्यामुळे उन्हामध्ये वाहतुकीचे कर्तव्य करणा या कर्मचारी यांना सुसह्य होणार आहे सदर कुलिंग जॅकेट व कुलिंग कॅपचे उपक्रमाबाबत सन्माननिय मान्यवरांनी कौतुक केले.तसेच प्रादेशिक परिवहन विभाग कार्यालयाकडून नो-हॉकींग हॉर्न बाबत हातात रिस्ट बॅन्ड बांधून जनजागृती केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहा.पोलीस आयुक्त,वाहतुक-१, श्री. प्रभाकर ढमाले यांनी केले आहे.

या कार्याक्रमाकरीता आर.एस.पी. अंतर्गत असलेल्या शाळांचे शिक्षक,ट्रॅफिक ॲम्बेसेडर,वाहतुक सल्लागार समिती सदस्य, परिवहन विभागाचे अधिकारी तसेच मान्यवर नागरीक हे उपस्थित राहुन समारोप कार्यक्रम चांगल्या प्रकारे पार पडला आहे.


जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, परिवहन विभाग व पोलीस विभाग, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने
२९ वे रस्ता सुरक्षा अभियान २०१८
पोलीस आयुक्तालय, पुणे


जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, परिवहन विभाग व पोलीस विभाग, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने